# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.02.2026** **वारः रविवार**

---

•या दशकात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारतानं केलेलं काम हेच २१ व्या शतकातील देशाच्या ताकदीचा पाया असेल, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, उत्तर प्रदेशातील मेगा चिप प्रकल्पाची पायाभरणी

•इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चा समारोप . कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित घोषणापत्राचा स्वीकार.

•'मन की बात' कार्यक्रमातून पंतप्रधान आज देशवासीयांशी संवाद साधणार

आणि

•ऑस्ट्रेलियावर १७ धावांनी विजय मिळवत, भारतानं महिला टी-२० मालिका जिंकली

**<u>मोदी-HCL-फॉक्सकॉन</u>**

उत्तर प्रदेशात एचसीएल-फॉक्सकॉन सेमीकंडक्टर सुविधेची स्थापना हे तांत्रिक स्वावलंबनाच्या दिशेने उचललेलं एक मोठं पाऊल आहे असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. हे दशक भारताचं तंत्रज्ञान दशक आहे आणि या दशकात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारतानं केलेलं काम हेच २१ व्या शतकातील देशाच्या ताकदीचा पाया असेल असं ते म्हणाले.

उत्तर प्रदेशातील यमुना एक्सप्रेसवे औद्योगिक विकास प्राधिकरण इथल्या इंडिया चिप प्रायव्हेट लिमिटेडची पंतप्रधान मोदी यांनी काल दूरस्थ पद्धतीनं पायाभरणी केली. हा HCL आणि फॉक्सकॉन यांचा संयुक्त उपक्रम प्रकल्प आहे. यामुळे उच्च दर्जाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर चिप उत्पादनाच्या परिसंस्थेत जागतिकदृष्ट्या भारताचं एक स्थान निर्माण होईल असं पंतप्रधान म्हणाले.

आज भारत, विकसित राष्ट्र होण्यासाठी खूप वेगानं काम करत आहे. जगानं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये भारताच्या एआय क्षमता पाहिल्या आहेत असंही पंतप्रधानांनी यावेळी सांगितलं.

सध्या देशात १२ लाख कोटींचं  इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन होत आहे असं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. नोएडा इथं उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पामधून ३ कोटी ६० लाख चिप्स तयार होतील अशी माहिती वैष्णव यांनी दिली.

२०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात उत्तर प्रदेशला २० हजार कोटी रुपये देण्यात आले आहेत अशी माहिती त्यांनी दिली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही यावेळी उपस्थितांना संबोधित केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ८२ किलोमीटर लांबीचा दिल्ली-मेरठ नमो भारत कॉरिडॉर आज राष्ट्राला समर्पित करणार आहेत. मेरठ मेट्रो आणि नमो भारत ट्रेनला पंतप्रधान हिरवा झेंडा दाखवतील. मेरठमध्ये सुमारे १२ हजार ९ शे ३० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**एआय-इम्पॅक्ट-एक्स्पो**

भारत मंडपम इथं आयोजित इंडिया एआय इम्पॅक्ट एक्स्पोचा काल समारोप झाला.  या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित घोषणापत्राला  एकंदर ८८ देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी मान्यता दिली. आर्थिक विकास आणि सामाजिक कल्याणासाठी एआयचा वापर करण्याबाबतच्या व्यापक जागतिक सहमतीचे प्रतिबिंब या घोषणेमध्ये आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवरील जागतिक सहकार्यात हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

या परिषदेच्या निमित्तानं जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातली  आघाडीची व्यक्तिमत्व आणि स्टार्टअप प्रतिनिधींसह शंभरहून जास्त देशांचे प्रतिनिधी, संशोधक, उद्योग क्षेत्रातल्या नामांकित व्यक्ती आणि धोरणकर्ते एकाच ठिकाणी आले होते. या प्रदर्शनाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पाच लाखांपेक्षा जास्त लोकांनी या प्रदर्शनाला भेट दिली, तसंच विविध कार्यशाळा तसंच चर्चासत्रांमध्ये सहभाग नोंदवला.

**अमितशाह**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी, आसाममधील कामरूप मेट्रो जिल्ह्यातील कचुटोली  इथं दहाव्या आसाम पोलिस बटालियनच्या नवीन परिसराची  काल पायाभरणी केली. या प्रकल्पासाठी सुमारे २६० कोटी खर्च अपेक्षित आहे..

येत्या पाच वर्षात आसाम हे देशाचं औद्योगिक केंद्र बनेल असं प्रतिपादन या प्रसंगी आयोजित सभेला संबोधित करताना शाह यांनी केलं. कॉंग्रेसच्या कार्यकाळात आसामकडे दुर्लक्ष झाल्याची

टीका त्यांनी केली आणि केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षात आसामला१५ लाख कोटी रुपये निधी वाटप केल्याची माहिती दिली. तत्पूर्वी गृहमंत्री केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ८७ व्या स्थापना दिनाच्या  संचलनाला गुवाहाटी इथ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**<u>मनकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज. आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमातून देश आणि परदेशातील लोकांसोबत संवाद साधणार आहेत. सकाळी 11 वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम या मालिकेतील 1 शे 31 वा भाग आहे.

**<u>भारत-ब्राझील</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा यांच्यात काल नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाली. भारत आणि ब्राझील यांच्यातील द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत, ३० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे महत्वाकांक्षी लक्ष्य ठेवण्यात आलं आहे. याआधी ठरवण्यात आलेलं २० अब्ज डॉलर्सच्या उद्दिष्ट ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांना पुरेसं वाटत नसल्यामुळे नवीन लक्ष ठरवण्यात आलं अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयातील सचिव पी कुमारन यांनी दिली.
तेल, वायू आणि अक्षय ऊर्जा, ब्राझिलच्या उपग्रहांना प्रक्षेपित करण्यासोबतच एकत्रितपणे उपग्रह निर्मिती करणे, जैवइंधन आणि शाश्वत विमान इंधन, शेती, पशुधन आणि आरोग्यसेवा तसंच योग यासह विविध क्षेत्रात सहकार्य वाढविण्याचा दोन्ही देश विचार करत असून यामुळे भारत-ब्राझील संबंध बळकट  होतील आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

**<u>ट्रम्पकर</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक आयातीवरील शुल्क १० टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालानंतर ट्रम्प यांनी ही घोषणा केली आहे. International Emergency Economic Powers Act या कायद्याअंतर्गत राष्ट्राध्यक्षांना सर्व देशांवर एकसमान आणि व्यापक स्वरूपाचे आयात शुल्क लावण्याचा अधिकार नाही असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं.

या निर्णयामुळे आधी आकारण्यात आलेल्या शुल्कांविरोधात अब्जावधी डॉलर्सच्या परताव्याच्या मागण्या दाखल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या निकालानंतर काही तासांतच ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेऊन नव्या शुल्काची घोषणा केली. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित तसेच व्यापारविषयक महत्त्वाचे टॅरिफ कोणत्याही व्यत्ययाशिवाय कायम राहतील असंही ट्रम्प यांनी

स्पष्ट केलं. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे अडथळा निर्माण झाला असला तरी आपली व्यापारनीती पुढे सुरूच राहील असं ठाम प्रतिपादन ट्रम्प यांनी केलं आहे.

**<u>मुंबईतेविजयदुर्ग</u>**

महाराष्ट्रातील मुंबई ते विजयदुर्ग दरम्यान जलवाहतूक प्रवासी फेरी सेवा येत्या 1 मार्चपासून सुरू होणार आहे. राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी याबाबतची घोषणा केली आहे. वाहनांच्या वाहतुकीची सोय यामध्ये उपलब्ध आहे. या सेवेमुळे कोकणच्या पर्यटनालाही गती मिळणार आहे. या जहाजाची क्षमता 620 प्रवासी आणि 35 वाहने वाहून नेण्याची क्षमता असून हे अंतर 6 ते 7 तासांत पूर्ण करता येणार आहे.

**<u>केरळSIR</u>**

केरळमध्ये मतदार यादयांच्या सखोल पुनरीक्षणानंतर, अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात आली आहे.  एकंदर 2 कोटी 29 लाख 53 हजार 6 शे 44 मतदारांचा, अंतिम मतदार यादीत समावेश आहे. निवडणूक आयोगाच्या संकेत स्थळावर मतदार आपली नावे पडताळून पाहू शकणार आहेत. विभागनिहाय मतदार याद्याही पडताळणीसाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये काल ऑस्ट्रेलियातील अ‍ॅडलेड इथल्या मैदानावर झालेल्या तीन सामन्यांच्या मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या वीस षटकांच्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियाचा १७ धावांनी पराभव करत मालिका २-१ अशी जिंकली. भारताच्या १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला

१५९ धावा करता आल्या. श्रेयंका पाटील आणि श्री चरणीने प्रत्येकी तीन बळी घेतले. भारताकडून स्मृती मानधनाने ५५ चेंडूत ८२ तर जेमिमा रॉड्रिग्जने ४६ चेंडूत ५९ धावा केल्या.

पुरुषांच्या वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर आठ गटात भारताचा सामना आज दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर, भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी 7 वाजता हा सामना सुरू होईल. न्यूझीलंड विरुद्ध पाकिस्तानचा पहिला सामना काल पावसामुळे रद्द करण्यात आला. दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार**.